अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई—३०
दुरध्वनी क्र.— ०२२—२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :— १४/०५/२०२५

## —: प्रेसनोट :—

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | १८/२०२५ |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | बापुराव मधुकर देशमुख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिवाजी नगर पोलीस ठाणे, मुंबई |
| लाचेची मागणी | रू. ३,००,०००/- (तडजोडीअंती रू. २,५०,०००) |
| स्विकारलेली रक्कम | रु. १,००,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे एका ट्रस्टचे संयुक्त सचिव आहेत. दिनांक २५/०८/२०२४ रोजी काही इसमांनी नमूद ट्रस्टच्या शाळेचे गेटचे कुलुप तोडून शाळेच्या कार्यालयात जबरदस्तीने प्रवेश करून संस्थेवर गैरकायदेशीर ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला. सदरबाबत तक्रारदार यांनी धर्मादाय आयुक्त, बृहन्मुंबई व शिवाजीनगर पोलीस ठाणे, मुंबई येथे तक्रारअर्ज दिला होता. त्याअनुषंगाने तक्रारदार यांनी दिनांक २२/०४/२०२५ रोजी शिवाजीनगर पोलीस ठाणे, मुंबई येथे जावून लोकसेवक श्री. बापुराव मधुकर देशमुख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांची भेट घेतली असता, त्यांनी धर्मादाय आयुक्त, वरळी, मुंबई यांचा अंतिम आदेश येईपर्यंत विरोधकांना शाळेत प्रवेश न देण्यासाठी, पोलीस संरक्षण व विरोधकांविरूध्द गुन्हा दाखल करण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे रू. ५,००,०००/- इतकी लाचेची मागणी केली. नमूद वेळी तक्रारदार यांनी ते फक्त ट्रस्टचे काम पाहतात व त्यांची तक्रार खरी आहे असे सांगितले असता, लोकसेवक यांनी कमीत कमी रू. ३,००,०००/- दयावेच लागतील तरच गुन्हा दाखल करण्यात येईल असे सांगितले. त्यानुसार तक्रारदार यांनी नमूद ट्रस्टचे पदाधिकारी यांचेशी चर्चा करून त्यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १३/०५/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १३/०५/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या कामाकरीता रू. ३,००,०००/- इतक्या लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. २,५०,०००/- लाचेची मागणी करून स्विकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना तक्रारदार यांचेकडून लाचेचा पहिला हप्ता म्हणून रक्कम रू. १,००,०००/- स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणुन त्यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :- श्री. यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक** **पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. सुरेश शिरसाठ, सहाय्यक पोलीस आयुक्त**

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

14/5

( अनिल घेरडीकर )
अपर पोलीस उप आयुक्त (१),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री** क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :— acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :— acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :— addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :— www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :— www.acbmaharashtra.net